महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com फोन क्र. ०२४७२- २९७४४०

जा.क्र. शावैमधा/आस्था-१/ 3930 - 31 /२०२५ दि.06/11 /२०२५

प्रति,

मा. आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
मुंबई.

विषय :- प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक विविध विषयातील कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात https://www.med-edu.in यावर प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे जाहिरात आदेश क्र. शावैमधा/आस्था-१/ 3926 /२०२५ दि. ०६.११.२०२५.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येत आहे की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव या संस्थेतील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक संवर्गातील विविध विषयात पदे रिक्त असुन सदरील पदे मंजुरीच्या तारखेपासुन अद्याप सदरील रिक्त पदे शासनास वारंवार भरण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु सदरील पदे अद्यापही रिक्त आहेत.

तद्नुषंगाने आपले पत्र क्र. संवैशिवसं/जाहिरात/करार/क-१/३५२१/२०२३ दि. ११.११.२०२३ च्या पत्रानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव या संस्थेतील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक वर्ग-१ संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत विहित नमुन्यातील जाहिरात प्रसिध्द करण्याकरिता या संस्थेची वेबसाईट, www.gmcdharashiv.org या वेबसाईट वर उपलब्ध आहे. तसेच तरी सदरील जाहिरात व उमेदवाराने करावयाचा अर्ज व उमेदवारांची माहिती विवरणपत्र हे https://www.med-edu.in यावर प्रसिध्द करणे बाबत विनंती करण्यात येत आहे.

सदरील जाहिरातीप्रमाणे प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदावर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती मिळण्याबाबतचा अर्ज स्विकारण्याचा कालावधी दि. ०६.११.२०२५ सकाळी १०.०० वाजेपासुन ते दि. १५.११.२०२५ सायं. ५ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे.

करिता माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासु,

(डॉ. शैलेंद्र द. चौहान,)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

प्रत मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

G.M.C.DHARASHIV
Outward No. 3926
Date- 06/11/25

## जाहिरात (WALK IN INTERVIEW) प्रसिध्द करावयाचा नमुना

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

### प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक वर्ग-१ ची रिक्त पदे कंत्राटी स्वरुपाने भरणे बाबत.

### जाहिरात प्रसिद्धी दिनांक.०६.११.२०२५

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे शासन निर्णयाद्वारे प्राध्यापक-२०, सहयोगी प्राध्यापक-२६ वर्ग-१ ची पदे मंजुर असुन रिक्त पदे प्राध्यापक-०४ व सहयोगी प्राध्यापक-०७ आहेत. सदरील पदे शासन नियमानुसार कंत्राटी स्वरुपाने भरण्यासाठी उमेदवाराने अर्ज https://www.med-edu.in या वर ऑनलाईन पध्दतीने भरावा. प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदावर सरळसेवा भरतीद्वारे किंवा बदलीद्वारे नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत शासनाने विहित केलेल्या निश्चित मानधन तत्वावर भरण्याकरिता संस्थेचे वेबसाईट www.gmcdharashiv.org व संस्थेच्या सुचना फलकावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर पदांचे विवरण खालील प्रमाणे आहे. तसेच या संस्थेने सदरील वेबसाईटवर टाकलेल्या जाहिरातीतील अटी व शर्ती अर्ज करणा-या उमेदवारांना लागु असतील.

| अ.क्र. | विषय | प्राध्यापक रिक्त पदे | सहयोगी प्राध्यापक रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | सुक्ष्मजीवशास्त्र | ०१ | ०० | एम.डी. |
| २ | शरीरविकृतीशास्त्र | ०० | ०२ | एम.डी./डीएनबी |
| ३ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र | ०१ | ०० | एम.डी. |
| ४ | न्यायवैद्यकशास्त्र | ०० | ०१ | एम.डी. |
| ५ | औषधवैद्यकशास्त्र | ०० | ०२ | एम.डी./डीएनबी |
| ६ | नेत्रचिकित्साशास्त्र | ०१ | ०० | एम एस/डीएनबी |
| ७ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | ०१ | एम.डी./डीएनबी |
| ८ | दंतरोगशास्त्र | ०० | ०१ | एम.डी.एस. |
| | एकुण | ४ | ७ | |

प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरताना मुलाखती हया मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई यांचे कार्यालयात होतील. सदरील उपरोक्त पदावरील नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर उमेदवारांना शा.नि.क्र. संकीर्ण-१०२३/प्र.क्र.२१४/वैसेवा-४ दि. १८ जानेवारी २०२४ मधील तरतुदीनुसार तसेच शा.नि.क्र. एमईएस-१५०८/९४/०८/एमईडी दि. ७.९.२०११ हे शासन निर्णयामधील अटी व शर्ती लागु राहतील. तसेच शा.नि.क्र. एलईसी-२०२१/प्र.क्र. १९९/वैसेवा-३ दि. ९.२.२०२२ नुसार वयाची मर्यादा ७० पेक्षा कमी असणा-या उमेदवारांना वरील प्रमाणे कंत्राटी नियुक्ती बाबत अर्ज दाखल करता येतील.

प्राध्यापक पदाकरिता वेतन रु. २,००,०००/- , सहयोगी प्राध्यापक पदाकरिता -१८५०००/- एवढे निश्चित मानधन अनुज्ञेय राहील. सदरील रिक्त पदासाठी अर्ज करावयाचा कालावधी दि. ०६.११.२०२५ सकाळी १०.०० वाजेपासुन ते दि.१५.११.२०२५ सायं. ५ वाजेपर्यंत राहील. सदरील उमेदवारास अर्ज करण्याचे निशुल्क असेल.

(डॉ. शैलेंद्र द. चौहान,)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.